


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २६३ ● पुणे ● सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
## आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

### तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त

# नवचेतना राज्यस्तरीय पुरस्कार २०२८

समाजासाठी समर्पित कार्याला सलाम !



## ॥ पुरस्कार श्रेणी ॥

- आदर्श जनसेवक
- आदर्श समाजसेवक
- आदर्श उद्योजक
- आदर्श पत्रकार
- आदर्श खेळाडू
- आदर्श शिक्षक
- आदर्श विधीज्ञ
- उत्कृष्ट अधिकारी
- विविध क्षेत्रातील जीवन गौरव

दिनांक : रविवार,
12 ऑक्टोबर 2025
ठिकाण : पुणे

**चला एकत्र येऊ, प्रेरणा होऊ!**

**विविध क्षेत्रातील नामवंत मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे**

आजच संपर्क साधा आणि आपली नोंदणी करा

**आपल्या कार्याची दखल घेतली जाण्याची ही संधी नका गमावू!**

पुरस्कार कार्यक्रमासाठी नोंदणी सुरू;आजच आपली स्पेस बुक करा
समाजासाठी झटणारे, प्रेरणा देणारे मान्यवर यासाठी नक्की नाव नोंदवा!

**मा.श्री.प्रतिक गंगणे**
(व्यवस्थापकीय संपादक)
7276314142

**मा.श्री.लक्ष्मण साबळे**
(निवासी संपादक)
86052 84272

**मा.श्री.अभिषेक मरगळे**
(मार्केटिंग हेड)
9359421909

**मा.श्री.डॉ.विश्वासराव आरोटे**
(समूह संपादक)
9423388508

# अमेरिकन टेनिसची नवी तारका



आर्यना सियारहिजेउना सबालेंका ही अमेरिकन ओपन टेनिसची यंदाची नवी तारका ठरली आहे. तिने नुकत्याच झालेल्या अंतिम सामन्यात अमांडा अनिसिमोव्हाला ६-३, ७-६ असा विजय मिळवला. आज सर्वात महान खेळाडू म्हणून ती ओळखली जाणार. सबालेंकाचे हे चौथे आणि या वर्षातील अखेरचे ग्रँडस्लॅम विजेतेपद होते. पण तिचा इथपर्यंतचा प्रवास निश्चितच वेदनादायक आणि खडतर होता. कारण अमेरिकन टेनिस ओपन विजेतेपद ही स्पर्धा हार्ड कोर्टवर खेळली जाते. त्यामुळे येथे प्रत्येक खेळाडूचा आणि त्याच्या शारीरिक क्षमतेचा कस लागतो. त्यातही ती महिला असेल तर जास्तच अवघड जाते. त्यामुळे अमेरिकन ओपन स्पर्धा जिंकणे ही तशीही आगळीवेगळी बाब आहे. ती यंदा आर्यनाने करून दाखवली आणि तिचे हे चौथे ग्रँडस्लॅम विजेतेपद आहे. आर्यना हिने आता किम क्लिस्टर्स, आरांता विकारिओ, नाओमी ओसाका आणि हाना मँडलिकोवा यांच्याशी बरोबरी साधली आहे. विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात पराभव पत्करल्यावर त्याच खेळाडूवर म्हणजे अनिसिमोव्हाबरोबर खेळण्यासाठी ती उतरेल असे कुणालाही वाटले नव्हते. पण आर्यनाने ही जिद्द दाखवली आणि तिने विजयही मिळवून दाखवला. खरे तर हा सामना गुंतागुंतीचा होता. पण जेतेपद कायम राखण्याच्या इराद्याने मैदानात उतरलेल्याा आर्यना सबालेंका हिने पहिल्यापासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवलं. पहिला सेट ६-३ असा एकतर्फी आपल्या नावे केला. दुसऱ्या सेटमध्येही प्रतिस्पर्धी आणि पहिल्या ग्रँडस्लॅमसाठी खेळणाऱ्या अमांडा अनिसिमोव्हा हिने तिला टक्कर देण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी ती फिकी ठरली. हा सेट ७-६(३) असा जिंकत सबालेंकानं या स्पर्धेतील विजयी सिलसिला कायम ठेवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

आर्यनाने अंतिम सामन्यात ज्या पद्धतीने लढा दिला आणि तिच्या भावनांना हाताळण्यास ती सक्षम ठरली ती खरोखरच प्रशंसेस पात्र आहे. आर्यना ही जास्त निडर आणि स्पष्ट विचारांची आहे. आर्यना सबालेंकाने विम्बल्डनच्या पराभवाचा बदला घेतला आहे, असे आता टेनिस जगतात बोलले जाऊ लागले आहे. त्याबरोबरच बेलारूसच्या या सुंदरीच्या विजेतेपदाचे अनिसिमोव्हाचे विजेतेपदाचे स्वप्न धुळीस मिळवले. अनिसिमोव्हाला प्रेक्षकांचा प्रचंड पाठिंबा असतानाही त्याने विचलित न होता सबालेंका शांत आणि थंड डोक्याने खेळली. आपल्या घरच्या मैदानावर अनिसिमोव्हाला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत होता. पण सबालेंका शांत राहिली आणि थंड डोक्याने तिने आपले जोरदार फटके खेळले. विजेतेपद असेच घडत असतात.



अगेन्स्ट ऑल ऑड्स जो विजय मिळवतो तोच खरा विजेता असतो. हे सबालेंकाने दाखवून दिले. यूएस ओपन टेनिस हे हार्ड कोर्टवर खेळले जाते आणि त्यात मोठ्या सर्विस करणाऱ्यांना तितकेसे अनुकूल वातावरण नसते. याअर्थाने हार्ड कोर्ट हे विविध शैली असलेल्या आणि खेळण्याच्या वेगवेगळ्या स्टाईल्स असलेल्या खेळाडूंना उपयुक्त असते. या खेळातील सर्व्हिसचा वेग, चेंडूचा वेग आणि अनिश्चितता यावर मात करत सबालेंकाने विजय मिळवला हेच तिच्या विजयाचे वैशिष्ट्य. हार्ड कोर्ट हे टेनिसमधील सर्वात जलद सर्व्हिसचे माहेरघर मानले जाते. पण हार्ड कोर्टवर खेळताना खेळाडूंसाठी एक अत्यावश्यक बाब म्हणजे त्याचे शारीरिक चापल्य आणि मानसिक संतुलन. या दोन्ही बाबतीत आर्यनाने अप्रतिम कौशल्य दाखवले आणि विजय मिळवला. १८ वेळा ग्रँडस्लॅम विजेती राहिलेली मार्टिना नवरातिलोव्हा हिच्या मते सबालेंका हिने दाखवलेला संयम आणि तिची शक्ती हीच तिच्या विजयाची गुरूकिल्ली होती. अत्यंत दबाव असतानाही आर्यनाने ती टेनिसची चॅम्पियन आहे हे दाखवून दिले.

अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धा ही हार्ड कोर्टवरील सर्वात अवघड स्पर्धा समजली जाते पण तिच्या आव्हानांतच तिची ताकद समाविष्ट आहे. टेनिसमध्ये आज क्रिकेटइतकाच किंबहुना त्यापेक्षाही जास्त पैसा आहे, कारण टेनिस हा खेळ आता प्रगत देशात खेळतात आणि भारतही त्यात मागे नाही. भारताचे विजय अमृतराज आणि लिअँडर पेस आणि महेश भूपथी यांनी देखील भारताचे नाव राखले. पण भारताच्या महिलांनी तशी शानदार कामगिरी केली नाही. पण त्यांना उत्तर अमेरिकन टेनिस खेळाडूंचे आहे. या खेळाडूंना पुरुषांइतकेच चापल्य आणि तंदुरुस्ती दाखवावी लागते. तेव्हा कुठे त्या यशस्वी होतात. ते या सर्व खेळाडूंनी केले आहे. आर्यना सबालेंका हिने अत्यंत गंभीर आव्हानांवर मात करत अमेरिकन ओपन टेनिसचे विजेतेपद जिंकले आहे. त्यात प्रथम होती खांद्याला झालेली दुखापत आणि त्यातून तिच्या सर्व्हिसवर परिणाम करणारे आरोग्याचे प्रश्न आणि त्याबरोबरच मानसिक आरोग्य सांभाळण्याची कसरतही करावी लागते. कारण क्रिकेटप्रमाणेच टेनिस हाही खेळ शारीरिक कमी आणि मानसिकरीत्या जास्त ताकदीचा आहे आणि जो मानसिकदृष्ट्या प्रबळ असतो तोच विजेता होतो. या सर्वांवर मात करून आर्यना सबालेंकाने विजेतेपद मिळवले आणि तिच्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली. अजून सबालेंकाला बरीच मजल मारायची आहे. सबालेंकाने नुकतेच आपले वडील गमावले. त्या काळात ती मानसिकरीत्या पूर्णपणे ढासळली होती. त्यावर तिला मात करायची होती. त्यामुळे तिने सर्व संकटांवर मात करून अमेरिकन ओपनचे विजेतेपद मिळवले हे निश्चितच तिच्या प्रखर निर्धाराचे आणि विजेतेपदासाठी काहीही करण्याची तयारी दाखवून देते. कधीकधी आर्यना आपला संयम हरवते आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यावर संतापते.

असे या वरच्या दर्जाच्या खेळाला चालत नाही. हा धडा ती शिकली आहे आणि काल ती ज्या संयमाने आपली टेनिसची रॅकेट फिरवत होती त्यावरून तिने या उणीवेवर मात केली आहे असे दिसते. या नव्या अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या तारकेला सलाम.

# पत्रकार संघाची आयुक्तांकडे धाव

- पत्रकारांवरील गैरवर्तनाचा निषेध



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्ता उड्डाणपूल उद्घाटनावेळी वार्तांकनासाठी गेलेल्या पत्रकारांशी पोलिसांकडून गैरवर्तणूक झाल्याची घटना समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत १ सप्टेंबर २०२५ रोजी हा कार्यक्रम पार पडला. मात्र, गोयलगंगा चौकात वार्तांकनासाठी पोहोचलेल्या इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मीडियातील पत्रकार, छायाचित्रकार आणि व्हिडिओग्राफर यांना पोलिसांनी वारंवार अडवले, ढकलले आणि ठिकाणावरून हाकलून दिले.प्रत्यक्ष वार्तांकनास मज्जाव करत पत्रकारांना रस्त्याच्या बाजूला उभे करण्यात आले. काही छायाचित्रकारांना हाताने ढकलण्यात आले, तर महिला पोलिसांना काठ्या आडव्या धरून पत्रकारांना रोखण्याचे आदेश दिले गेले. एवढेच नव्हे, तर पत्रकार पुढे येऊ नयेत म्हणून दोरी आडवी बांधण्यात आली. या अपमानास्पद वागणुकीचा निषेध पुणे श्रमिक पत्रकार संघाने नोंदवला आहे. ८५ वर्षांचा इतिहास असलेल्या या संघात पुणे व पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ५०० पत्रकार सभासद आहेत. संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील आणि सरचिटणीस मंगेश फल्ले यांनी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन लेखी निवेदन दिले. त्यांनी स्पष्ट केले की, "लोकशाहीत माध्यमांना वार्तांकनाचे स्वातंत्र्य आहे. त्यात अडथळा आणणे अयोग्य आहे. वरिष्ठ अधिकारी पत्रकारांशी योग्य वागतात, पण कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी वारंवार दादागिरी करतात. विशेषतः नवोदित पत्रकारांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो." पत्रकार संघाने स्पष्ट केले की, पत्रकार नेहमीच पोलिसांच्या सूचनांचे पालन करतात, मात्र अपमानकारक वागणूक स्वीकारार्ह नाही. "पोलिस दलाने पत्रकारांशी सन्मानाने वागून सहकार्याचे संबंध दृढ करावेत," अशी अपेक्षा संघाने व्यक्त केली आहे.

### पोलीस आयुक्तांची प्रतिक्रिया

**निवेदनानंतर पोलिस आयुक्तांनी तात्काळ दखल घेतली. त्यांनी सर्व पोलिसांसाठी स्पष्ट सूचना करणारे पत्र काढण्याचे आश्वासन दिले. तसेच, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बैठकीत या विषयावर चर्चा करून पत्रकारांशी गैरवर्तणूक होऊ नये यासाठी एसओपी (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर) तयार करण्याचेही आश्वासन दिले.**

## अरेरावी आणि हल्ले सहन करणार नाही : प्रतिक गंगणे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पत्रकारांवरील अरेरावी आणि हल्ले अजिबात सहन केले जाणार नाहीत. पत्रकार हा समाजाचा आरसा आहेत. त्यांच्या कामात अडथळा आणणे म्हणजे लोकशाहीवर गदा आणण्यासारखे आहे," असे मत दैनिक 'आरंभ पर्व'चे व्यवस्थापकीय संपादक तथा 'पुणे प्रहार'चे संपादक प्रतिक गंगणे यांनी व्यक्त केले.

सिंहगड रस्ता उड्डाणपूल उद्घाटनावेळी पत्रकारांशी पोलिसांकडून झालेल्या गैरवर्तणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी संताप व्यक्त केला. पत्रकारांना वार्तांकनाच्या जागेवरून हाकलून देणे, छायाचित्रकारांना ढकलणे आणि महिला पत्रकारांसमोर काठ्या आडव्या धरणे हा प्रकार धक्कादायक असल्याचे गंगणे यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, "पत्रकार हे लोकांसाठी काम करणारे आहेत. त्यांच्यावर दबाव टाकून, अरेरावी करून किंवा हल्ला करून कुणीही पत्रकारितेचा आवाज दाबू शकत नाही. पोलिस प्रशासनाने तातडीने याबाबत ठोस कारवाई करावी, अन्यथा पत्रकार संघटनांना रस्त्यावर उतरावे लागेल."

गंगणे यांनी स्पष्ट केले की, पत्रकार संघटनांची ताकद मोठी आहे आणि त्या एकत्र आल्या तर प्रशासनालाही विचार करावा लागेल. "पत्रकारांवरील अन्याय, अरेरावी आणि हल्ले आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. यापुढे अशी घटना घडल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल," असा इशारा त्यांनी दिला.

## हृदय विकाराचा झटका आलेल्या प्रवाशाचे वाचले प्राण

**दिवे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर आगारातून जेजुरी रूट नंबर 210 या बसमध्ये चालक, सहप्रवासी व वाहकाच्या सतर्कतेमुळे एका प्रवाशाचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. ही घटना गुरुवारी (दि. 4) घडली.जेजुरीवरून नेहमीप्रमाणे बस हडपसरला निघाली होती. ही बस पवारवाडीजवळ येताच मुंढवा येथील प्रवासी शामराव जाधव यांना अस्वस्थ वाटू लागले. पुढे हा त्रास वाढू लागला. प्रवाशाला चक्कर येऊन ते बेशुद्ध झाले. त्यांना त्या वेळी हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती शांताराम झेंडे या प्रवाशाने चालक व वाहक यांना सांगितले. तसेच जवळच डॉ. अतुल जाधव यांचे खासगी रुग्णालय असल्याचाही माहिती दिली. त्यानुसार बसचालक मच्छिंद्र कुंभार व बसवाहक सागर पाटील यांनी तातडीने बस रुग्णालयाकडे नेली. त्यांना काळेवाडी येथील अरुंद रस्ता आणि गणेशोत्सवाच्या गर्दीचा सामना करावा लागला. रुग्णालयात दाखल करताच डॉ. जाधव यांनीही वेळ न दवडता प्रवाशी शामराव जाधव यांच्यावर उपचार सुरू केले.छातीवर पंपींग करत जाधव यांना शुद्धीवर आणले. प्रवाशी जाधव यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉ. अतुल जाधव यांनी दिली.

## फणी आळीत चंद्रराव मोरेला दिलेल्या शिक्षेचा जिवंत देखावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कसबा पेठेतील फणी आळी तालीम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे यंदा एक ऐतिहासिक प्रसंग जिवंत देखाव्याच्या स्वरूपात उभा करण्यात आला आहे. "जावळीचे चंद्रराव मोरे याला छत्रपती शिवाजी महाराजांनी कसा धडा शिकवला?" या प्रश्नाचे प्रभावी उत्तर या देखाव्यातून रसिकांसमोर सादर करण्यात आले आहे.

या देखाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्याय-नीतीचा, धैर्याचा आणि शिस्तीचा ठसा उमटवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका पीयूष




क्षीरसागर यांनी साकारली असून त्यांच्या अभिनयात शिवरायांची धडाडी स्पष्टपणे जाणवते.

चंद्रराव मोरे यांची भूमिका श्रीपाद कांबळे यांनी रंगवली आहे. तर मुरारबाजी आणि सोनोपंत यांच्या भूमिका ओमकार वैद्य यांनी साकारल्या आहेत. मावळा झुंझारराव कामठे याची भूमिका महेश वरवटे (लातूरकर) यांनी केली आहे. तसेच, बहिर्जी नाईक यांच्या भूमिकेत मनोज लोटण पाटणगिरी यांनी प्रभावी कामगिरी केली आहे. सरदार हैबतराव शिळीमकर यांच्या भूमिकेत भावेश पाटील यांनी भूमिका साकारून रंगत वाढवली आहे. या देखाव्याचे लेखन व दिग्दर्शन पीयूष क्षीरसागर यांचेच असून रंगभूषा हर्षदा पाटील यांनी केली आहे. ऐतिहासिक सत्यता जपून, पात्रांचे वास्तव भास निर्माण करण्याचा प्रयत्न रंगभूषेतून दिसून येतो. दरम्यान, हा देखावा पाहण्यासाठी भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. ऐतिहासिक घटनांचे दर्शन घडवणारा हा उपक्रम रसिकांकडूनही दाद मिळवत असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# जवळगावमध्ये भक्तिमय वातावरणात तुळजाभवानी मंदिराचे लोकार्पण

## नागेश चव्हाण यांचे गावकऱ्यांसाठी अविरत प्रयत्न आई जगदंबेचा आशीर्वाद; खा. ओमराजे निंबाळकर

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

गावकऱ्यांच्या श्रद्धेचे प्रतीक ठरणारे तुळजाभवानी मंदिर जवळगावमध्ये लोकार्पण सोहळ्याने भक्तीमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले. उद्योजक नागेश चव्हाण यांच्या संयोजनातून व नियोजनातून हा भव्य सोहळा पार पडला.

या कार्यक्रमास खासदार ओमराजे निंबाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, मराठा सेवक युवराज काटे, माजी शिक्षण समिती सभापती मकरंद निंबाळकर, अरुणभाऊ सावंत, वैराग पोलीस स्टेशनचे अधिकारी कुंदन गावडे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण काकडे, राष्ट्रवादी सरचिटणीस प्रमोद कापसे, मनसे तालुकाध्यक्ष आप्पाभाई गाटे तसेच महंत श्री



अगस्त नंदगिरीजी महाराज (श्री पंचदशनाम जुना आखाडा), मोहन भोसले, सुनील जाडकर, हनुमंत जाडकर, शशिकांत कापसे, गणेश कापसे, मधुकर चव्हाण, अनिल कापसे, लक्ष्मण चव्हाण, नेताजी गांजले, सोमनाथ चव्हाण, नवाज मुलानी, मुजबिल पठाण, बापू चौबे, बाबा शेख, प्रशांत भालशंकर, समाधान पवार यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

उद्घाटन प्रसंगी नागेश चव्हाण यांनी मान्यवरांचे स्वागत केले, तर सोमनाथ चव्हाण यांनी



अभिषेक करून धार्मिक विधी पार पाडले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

प्रास्ताविकातून नागेश चव्हाण म्हणाले, "गावकऱ्यांना तुळजाभवानीचा आशीर्वाद मिळावा या उद्देशाने या मंदिराची उभारणी केली. आज तो संकल्प साकार होताना मला अत्यंत समाधान वाटते. भविष्यातही गावकऱ्यांच्या सेवेसाठी चांगले काम करण्याचा मानस आहे."

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी नागेश चव्हाण यांच्या कार्याचे कौतुक करताना गावाच्या विकासासाठी झटणाऱ्या या सुपुत्राच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनीही मंदिर उभारणीसाठी चव्हाण बंधूंच्या कार्याचे कौतुक करत "आई जगदंबेचा आशीर्वाद ज्याच्या पाठीशी आहे, त्याची प्रगती निश्चित आहे" असे मत व्यक्त केले.

सोहळ्यानिमित्त कळसरोहन व लोकार्पणानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. त्याचबरोबर जागरण-गोंधळ कार्यक्रमामुळे वातावरण अधिकच भक्तिमय झाले.

जगदंब जगदंबच्या जयघोषात तुळजाभवानी मंदिराचे लोकार्पण सोहळा ऐतिहासिक ठरला.

# थोडक्यात



## शिरूर अनंतपाळ व निलंगा तालुक्यात पीक नुकसान पाहणी दौरा संपन्न

**लातूर (आरंभ पर्व) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष व निलंगा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय नेते मा. अशोकराव शिवाजीराव पाटील निलंगेकर (भैय्यासाहेब) आणि खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी शिरूर अनंतपाळ व निलंगा तालुक्यातील पूरग्रस्त भागांचा दौरा करून पिकांचे नुकसान पाहणी केली. मांजरा नदीपात्र व डोंगरगाव बॅरेज परिसर तसेच डोंगरगाव, हालकी, उजेड, ढोबळेवाडी, मुगाव, निटुर, मसलगा या गावांमध्ये शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांची व्यथा जाणून घेतली. अनेक शेतकऱ्यांनी या वेळी माजी मुख्यमंत्री कर्मयोगी स्व. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांची आठवण काढली. "आदरणीय दादासाहेबांमुळे आमची शेती वाचली. त्यावेळी बॅरेजमध्ये आमच्या जमिनी जाऊ नयेत यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले," असे म्हणताना शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दाटले. या पाहणी दौऱ्यात प्रा. सुरेंद्र धुमाळ, नगरसेवक सुधीर लखनगावे, व्यंकटराव शिंदे, सरपंच रमेश मोगरगे, माजी सरपंच गोविंद काटे, चेअरमन रमेश मोगरगे, धोडिंराम ढोक, अशोकराव भदरगे, पंडितराव भदरगे, विठ्ठलराव पाटील वांजरखेडकर, श्रीधर झरकर, द्यानेश्वर पिंड मसलगेकर, चेअरमन नरसिंग ढाकणे, बालाजी पाटील ताजपुरकर, डॉ. कालिदास शेंदकर, सुनील झरकर, माजी सरपंच ओम पाटील, सतिश कोळेकर, कुमार मोगरगे, राम झरकर, बापुसाहेब पौळ, बाळु मोगरगे, आबासाहेब देशमुख, ओमप्रकाश पाटील, दिनकर सावंत, विठ्ठल झरकर आदी मान्यवर, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शेतकऱ्यांनी या वेळी काँग्रेस नेत्यांना आपली मागणी व अडचणींचे निवेदन दिले. पीक नुकसानीमुळे शेतकरी संकटात सापडले असून सरकारने तत्काळ मदत करावी, अशी मागणी करण्यात आली.**




## अविरत करिअर अकॅडमीचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा

**पुणे (आरंभ पर्व) : जिल्ह्यातील डोणजे येथे पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देणारी अविरत करिअर अकॅडमीचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे ग्रामीणचे डी.वाय.एस.पी. सुनिलकुमार पुजारी उपस्थित होते. सोबत ए.एस.आय. कुंभार सर, पोलीस कॉन्स्टेबल विक्की खोमणे, सहकारी गणेश चोरमोले, तसेच मार्गदर्शक टीममधील इशराक शेख, रूपेश गोनाळ, जाधव, पाटील व नांदेडकर सर विचारमंचावर विराजमान होते. विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. मान्यवरांनी यश-अपयशाचा सामना करताना जिद्द, मेहनत आणि दैनंदिन सरावाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमात माजी सैनिक चव्हाण सरांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अफरिन शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन मयुर सरोदे यांनी मानले. यावेळी पालक प्रतिनिधी शशिकांत अहिवळे, विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार गायकवाड, गणेश कुटेकर, ऋतुराज जेधे आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी आर्या पारगे उपस्थित होते. पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.**

## विसर्जनासाठी गेलेला युवक कुकडी नदीपात्रात बुडाल्याने बेपत्ता

**नारायणगाव (आरंभ पर्व) : जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा येथील सार्वजनिक गणपतीचे विसर्जन करण्यासाठी कुकडी नदीचे पात्रात अशोक खंडू गाडगे हा २६ वर्षाचा युवक गेला असता तो पाण्यात बुडून बेपत्ता झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्याचा शोध स्थानिक तरुण व पोलीस यंत्रणा करीत आहे. सार्वजनिक गणपतीचे विसर्जन करण्यासाठी तो नदीच्या पात्रात उतरला होता अशी प्राथमिक माहिती मिळत आहे.**

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

● वर्ष : ०२ ● अंक : २६३ ● पुणे ● सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# यंदाही पुणेकरांचा जल्लोष

## पुण्यातील विसर्जन मिरवणूक यंदा ३४ तास ४२ मिनिटे

### शनिवारी सकाळी ९.३० वाजता मिरवणूक सुरू; रविवारी रात्री ८.१२ वाजता मिरवणुकीची सांगता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेच्या निवडणुका तोंडावर आल्याने मंडळांवरील निर्बंधांना देण्यात आलेली ढील, मानाच्या मंडळांसह अनेक मंडळांनी घेतलेला मोठा वेळ आदी कारणांमुळे पुण्यातील यंदाची मुख्य विसर्जन मिरवणूक आत्तापर्यंतच्या इतिहासातील विक्रमी वेळेची नोंद करणारी ठरली. या मिरवणुकीला तब्बल 34 तास 42 मिनिटे एवढा वेळ लागला. पुणेकरांचा उत्साही आणि भरभरून प्रतिसाद, विविध कलांचे बहारदार सादरीकरण ही या मिरवणुकीची वैशिष्ट्ये ठरली.

मानाचे गणपती सायंकाळी साडेसातपर्यंत विसर्जित झाले. त्यापाठोपाठ श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा गणपतीही रात्री साडेआठ वाजता विसर्जित झाला. प्रचंड गर्दी, गणपती मंडळांचा व पुणेकरांच्या रात्रभर ओसंडून वाहणारा उदंड उत्साहात ही मिरवणूक झाली.

शहरातील प्रमुख विसर्जन मार्गावरून निघालेल्या मिरवणुकीत सुमारे 559 गणपती मंडळांनी भाग घेतला. कोणताही अनुचित प्रकार न घडता मिरवणूक शांततेत पार पडली. पुण्यातील मिरवणूक पाहण्यासाठी येणाऱ्या

भक्तांची गर्दी चौपट वाढल्याचे दिसून आले. तसेच, मेट्रो व पीएमपी सेवेमुळे नागरिकांची झालेली सोय याचाही परिणाम गर्दीवर दिसून आला.

शनिवारी सकाळी 9.30 वाजता महात्मा फुले मंडईतील टिळक पुतळ्यापासून सुरू झालेली मिरवणूक रविवारी रात्री 8 वाजून 12 मिनिटांनी संपली. विसर्जन मिरवणूक नेहमीपेक्षा काही तास आधी संपविण्याचे नियोजन केले होते. पण, ऐनवेळी पोलिसांनी सर्वांनाच ढील दिल्याने त्याचा परिणाम मिरवणूक लांबण्यात झाला.

टिळक चौकातील गर्दी उत्तररात्री संपूर्णपणे आटोक्यात आली होती. मात्र, गणेश मंडळांचा उदंड उत्साह आणि काही ठिकाणी झालेले वाद तसेच थकले भागलेले पोलिस कर्मचारी व अधिकारी, गणेश मंडळांचे पदाधिकारी ही मिरवणूक लवकर आटोक्यात आणू शकले नाहीत.

रविवारी दुपारी 4 वाजेपर्यंत टिळक रस्त्यावर पन्नास मंडळे रांगेत होती. दुपारी 2 पर्यंत स्वारगेट परिसरातील लक्ष्मीनारायण चित्रपटगृहापर्यंत रांगा लागल्याचे चित्र होते. विसर्जन करून परत येणाऱ्या प्रचंड उंचीच्या रथांमुळे अनेक रस्त्यांवर रविवारी दुपारपर्यंत मोठी वाहतूक कोंडी झाली होती.





**पुण्यातील विसर्जन मिरवणूकीला 26 तास उलटून गेले मात्र अजुनही मोठ्या प्रमाणात गणपती मंडळांच्या विसर्जन मिरवणूका सुरु होत्या. काल साडेनऊ वाजता पुण्यातील विसर्जन मिरवणूकीला सुरुवात झाली होती. पाच मानाच्या गणपतींचे आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे विसर्जन वेळेत झाले. मात्र त्यानंतर पुण्याची विसर्जन मिरवणूक रेंगाळली.**

महात्मा फुले मंडईतील टिळक आणि यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पोलिस आयुक्त अमितेश कुमार आदींनी टिळक पुतळ्यासमोर पुण्याचे ग्रामदैवत व मानाच्या पहिल्या कसबा गणपतीला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर पुण्याचे भूषण असलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. कार्यकर्त्यांच्या उत्साहाला प्रतिसाद देत या तिन्ही मंत्र्यांनी ढोल वादनाचा आनंद लुटला.

## डिजेच्या ठेक्याऐवजी वाजंत्री, फुलांची उधळण करत मिरवणूक

**खेड पोलिस ठाण्यातील गणपती मूर्तीची विसर्जन मिरवणुक डिजेच्या गोंगाटाऐवजी पारंपरिक वाजंत्र्यांच्या मधुर स्वरांनी आणि फुलांच्या उधळणीसह खाकी वर्दीतील पोलिसांनी बाप्पाच्या विसर्जनात उत्साहाने नृत्य केले. राजगुरुनगर शहराच्या मुख्य रस्त्यावरून निघालेल्या या मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधले. या मिरवणुकीचा शुभारंभ आमदार बाबाजी काळे आणि अतुल देशमुख यांच्या हस्ते झाला. यावेळी संजय घनवट, विजया शिंदे, कैलास सांडभोर आणि ॲड. मनिषा टाकळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण आणि संतोष घोलप यांनी मान्यवरांचे स्वागत केले. खेड पोलीस ठाण्यात गणपती उत्सव साजरा करण्यात येतो. दरवर्षीप्रमाणे यावर्षी दहा दिवस धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील सार्वजनिक मंडळांच्या गणपती विसर्जन मिरवणुक संध्याकाळी काढण्यात येतात. त्यासाठी रात्रभर पोलिसांना बंदोबस्तात व्यस्त रहावे लागते. म्हणुन त्यापूर्वी म्हणजे शनिवारी (दि ६) दुपारी एक वाजता पोलीस ठाण्यात आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते प्रारंभ करून गणेश विसर्जन मिरवणुक काढण्यात आली. पोलिसांनी पारंपरिक संगीत आणि उत्साहपूर्ण वातावरणात बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेऊन सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवले. हा अनोखा उपक्रम परिसरातील नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला.**

## मानाच्या गणपतींचे एकापाठोपाठ विसर्जन

**मानाच्या पहिल्या कसबा गणपतीपाठोपाठ ग्रामदेवता व मानाचा दुसऱ्या तांबडी जोगेश्वरी मंडळाच्या गणपतीचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व हे मंडळही मिरवणुकीत सहभागी झाला. मानाचे गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा हे गणपतीही मिरवणुकीत सहभागी झाले. सव्वासहा तासांच्या मिरवणुकीनंतर दुपारी पावणेचार वाजता कसबा गणपतीचे विसर्जन झाले. तर इतरही मानाच्या गणपतींचे पावणेसहा वाजेपर्यंत एकापाठोपाठ विसर्जन करण्यात आले.**

## टिळक रस्त्यावरील मिरवणुकीत सर्वाधिक सहभाग

**शहरातील लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता, कर्वे रस्ता आणि टिळक रस्ता या पाच प्रमुख मार्गावरील मिरवणुका नेहमीच गणेश भक्तांची गर्दी खेचणाऱ्या ठरल्या आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी मोठी चुरस असते. यंदा टिळक रस्त्यावरील मिरवणुकीत सर्वाधिक म्हणजे तब्बल 210 मंडळे सहभागी झाली. त्या खालोखाल लक्ष्मी रस्ता (155), केळकर रस्ता (109), कुमठेकर रस्ता (61) तर कर्वे रस्त्यावरील मिरवणुकीत (24) मंडळांनी भाग घेतला.**

## पुण्यात महिला पत्रकाराचा विनयभंग




**पुणे, अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान वार्तांकन करत असलेल्या एका महिला पत्रकाराचा विनयभंग झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. बुधवार चौकात घडलेल्या या प्रकारानंतर पुणे श्रमिक पत्रकार संघाने पाठपुरावा केला. त्यानंतर अखेर फरासखाना पोलीस ठाण्यात त्रिताल ढोल-ताशा पथकातील दोन अनोळखी सदस्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 20 वर्षीय महिला पत्रकाराने पोलिसांकडे फिर्याद नोंदवली आहे. सहा सप्टेंबर रोजी सायंकाळी 7.15 ते 7.40 दरम्यान त्या आपल्या एका मित्रासोबत गणेश विसर्जन मिरवणुकीचे वार्तांकन करत होत्या. त्यावेळी पथकातील एका 25 वर्षीय सदस्याने लोखंडी ट्रॉलीचे चाक त्यांच्या पायावर घातले. याबाबत पत्रकारांनी विचारणा केली असता, त्याने धक्काबुक्की करत छातीला स्पर्श करून मागे ढकलले. या घटनेमुळे तक्रारदाराच्या मनात लज्जा उत्पन्न झाली. दरम्यान, सोबत असलेल्या शोएब तडवी यांनी आरोपीला जाब विचारल्यावर त्यांनाही ढकलून देत शिवीगाळ करण्यात आली. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार नोंदवण्यात आली असून, आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम 74, 75(1), 352, 3(5) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास फरासखाना पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक पूनम पाटील करत आहेत.**

## मिरवणूक रेंगाळली; पोलीस गणपती मंडळांपुढे हतबल?

**पुण्यात गणेशोत्सव मिरवणूक रेंगाळलीच असून सकाळपासून टिळक चौकात पोलिसांकडून मंडळांना वेग वाढवण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. लवकर पुढे न गेल्यास कारवाई करणार, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे. दुपारी 2 वाजेपर्यंत 204 मंडळे टिळक चौकातून मार्गस्थ झाली आहेत. यंदाची गणेश विसर्जन मिरवणूक एक तास आधी सुरू झाली. मानाच्या पाचही गणपतींचे वेळेवर विसर्जन झाले असले तरी नंतर अनेक मंडळांमध्ये अंतर वाढल्यामुळे मिरवणुका रात्री उशिरापर्यंत रेंगाळल्या होत्या. त्यानंतर आजही मिरवणुका सुरूच आहेत. लक्ष्मी रस्त्याचा 35 वा मंडई गणपती पहाटे चार वाजता टिळक चौकात पोहोचला. म्हणजेच पहिल्या साडेअठरा तासात फक्त 35 मंडळे लक्ष्मी रस्त्यावरून गेली होती. दुपारी साडेबारा वाजेपर्यंत 179 मंडळे टिळक चौकातून मार्गस्थ झाली होती.**

## ठळक बातम्या

### लैंगिक अत्याचार

**कोरेगाव भीमा (आरंभ पर्व) : सणसवाडी (ता. शिरूर) येथील परिसरातील एका पाचवर्षीय मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. याप्रकरणी पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी एकाला अटक केली आहे. फंटूसदास दिलीप मोची (सध्या रा. सणसवाडी, ता. शिरूर, मूळ रा. गोपाळपूर ता. चानन कुमादर, जि. लखीसराय, बिहार) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर बाललैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक माहितीनुसार, आई घरात असताना पीडित मुलगी ही तिच्या भावासोबत घराच्या अंगणात खेळत होती. त्या वेळी आरोपी मोची याने भावाला चॉकलेट आणण्यासाठी पैसे देऊन दुकानात पाठवले. त्यानंतर मुलीला शेजारील खोलीमध्ये नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक विजय मस्कर हे पुढील तपास करत आहेत.**

### राज्यातील पाऊस कमी झाला

**पुणे (आरंभ पर्व): राज्यातील बहुतांश भागातून मोठा पाऊस कमी झाला असून, कोकण आणि मध्यमहाराष्ट्रातील काही भागात 10 सप्टेंबरपर्यंत तुरळक पावसाचा अंदाज आहे. गणेशविसर्जन मिरवणुकीला पावसाने उघडीप दिली. मात्र, दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी काही भागात पावसाने हजेरी लावली.**

## गणेश विसर्जनाला गालबोट; पुण्यात सहा जणांचा बुडून मृत्यू

**चाकण (दै. आरंभ पर्व)**

खेड, शिरूर आणि जुन्नर या तालुक्यांत शनिवारी (दि. 6) गणेश विसर्जनादरम्यान दुर्दैवी घटना घडल्या. खेडमधील वाकी, बिरदवडी, शेलपिंपळगाव; शिरूरमधील तळेगाव ढमढेरे आणि जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा परिसरात सहा जणांचा विहीर, नदीपात्रातील पाण्यात बुडून मृत्यू झाला आणि काहींचा शोध अद्याप सुरू आहे. चाकणजवळील वाकी खुर्द हद्दीत भामा नदीकाठी गणेश विसर्जनासाठी गेलेले अभिषेक अशोक भाकरे (वय 21, रा. कोयाळी, ता. खेड) व अनंत जयस्वाल (वय 20, रा. चाकण, ता. खेड) यांचा बुडून मृत्यू झाला. एका युवकाला वाचविण्याचा प्रयत्न करताना दोघेही पाण्यात बुडाले. अभिषेकचा मृतदेह बाहेर काढण्यात आला

**● खेड, शिरूर, जुन्नर तालुक्यांतील घटना**

असून, अनंतचा मृतदेह रात्री उशिरापर्यंत सापडला नव्हता. चाकण रेस्क्यू टीम, एमडीएफ आणि अग्निशमन विभागाचे जवान शोध मोहीम राबवत आहेत. बिरदवडी (ता. खेड) येथे गणेश विसर्जनादरम्यान संदेश पोपट निकम (वय 36, मूळ रा. सिन्नर, जि. नाशिक) यांचा विहिरीत बुडून मृत्यू झाला. पोहता येत असूनही ते पाण्यात खेचले गेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. निकम यांना चांगल्या प्रकारे पोहता येत असताना घडलेल्या या घटनेबाबत आश्चर्य आणि हळहळ व्यक्त होत आहे. शेलपिंपळगाव येथे देखील विसर्जनावेळी एक जण बुडाल्याची माहिती रात्री उशिरा समोर आली.

# पुणेकरांनी अनुभवला ‘ब्लड मून’चा नजारा

### रविवारी दिवसभर पाऊस सुरू असल्याने चंद्रग्रहण दिसते की नाही, याबद्दल होती शंका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रविवारी रात्री 9.40 ते पहाटे 1.30 पर्यंत संपूर्ण भारतातील नागरिकांनी खग्रास चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद लुटला. टीव्हीवर आस्था विरुद्ध विज्ञान अशी स्पर्धा रंगलेली असतानाच धार्मिक नागरिकांनी जप करत तर वैज्ञानिक नागरिकांनी चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद लुटला पुण्यातील केसरीवाड्यावर ज्योतिर्विद्या परिसंस्थेच्या वतीने चंद्रग्रहण पाहण्याचे आयोजन करण्यात आले होते.

रविवारी दिवसभर पाऊस सुरू असल्याने चंद्रग्रहण दिसते की नाही, याबद्दल शंका होती. मात्र रात्री नऊ वाजता चंद्राचे प्रखर बिंब ढगांमधून बाहेर आले आणि पांढरेशुभ्र खळे दिसले.



चंद्र ढगाच्या आत-बाहेर जात होता. मात्र ग्रहणाचा स्पर्श होताच सर्व ढग बाजूला झाले रविवारी रात्री 9 वाजून 40 मिनिटांची ग्रहणाचा स्पर्श झाला. हळूहळू पांढरा चंद्र, पिवळा, तांबूस आणि शेवटी लाल झालेला दिसला. रात्री 12.30 नंतर ग्रहण सुटण्यास सुरुवात झाली तेव्हा चंद्र तांबूस ते पांढराशुभ्र होत गेला.

पुण्यातील केसरी वाड्यातून लाईव्ह चंद्रदर्शनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध प्रकारच्या दुर्बिणींनी हे चंद्रग्रहण विद्यार्थ्यांनी पाहिले. जपानमधील चंद्रग्रहण या ठिकाणी शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना लाईव्ह दाखवले.

पुण्यात रात्रीचे 11 वाजले तेव्हा जपान देशात पहाटेचे अडीच वाजले होते. जपानमधील मराठी शास्त्रज्ञांनी तेथील चंद्रग्रहणाची माहिती दिली.

भारतात सर्व शहरातून एकसारखेच चंद्रग्रहण दिसले.

लोकांनी मोबाईलमधूनही या छटा टिपल्या. मुंबई, पुणे, कोलकाता, दिल्ली, लखनौ, हैदराबादसह अनेक शहरातून हे ग्रहण दाखविले जात होते.

## भूमिअभिलेख विभागाचे उपसंचालक सूर्यकांत मोरे निलंबित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कामात अनियमितता, पदाचा गैरवापर करून मोजणीच्या निकालामध्ये केलेली अदलाबदल, त्यावर आलेल्या नागरिकांच्या अनेक तक्रारी, याबाबत चौकशी समितीच्या अहवालानंतर भूमिअभिलेख विभागाचे पुणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हा अधीक्षक तथा सध्याचे उपसंचालक (एकत्रीकरण विभाग) सूर्यकांत मोरे यांना अखेर निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या निलंबनाचा आदेश महसूल विभागाच्या उपसचिव अश्विनी यमगर यांनी शुक्रवारी (दि. 5) काढला. या आदेशानुसार त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

मोरे यांच्या निलंबनाने भूमिअभिलेख विभागात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, काळाबाजार करणाऱ्या




कोणाचीही गय केली जात नसल्याचा संदेश मोरे यांच्या निलंबनाने गैरप्रकार करू पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये गेला आहे. या निलंबन प्रकरणामुळे आणखी 'मासे' गळाला लागणार असून, त्याचीही चौकशी होणार असल्याचे बाब पुढे आली आहे.

पुणे जिल्ह्याचे भूमिअभिलेख विभागाचे तत्कालीन जिल्हा अधीक्षक सूर्यकांत मोरे यांनी त्यांच्या काळात भूमापनात मोठे फेरफार करून क्षेत्रफळ कमी-जास्त दाखविले, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. दरम्यान, सामान्य नागरिक जमीन मोजणीसाठी त्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवत असताना मोरे यांनी बिल्डर-राजकारण्यांच्या फायद्यासाठी काम केले.

त्यामुळे अनेक नागरिक हतबल झाले. शेतकऱ्यांच्या तक्रारींना डावलून मोरे यांनी बेकायदा कमाई केल्याचे गंभीर आरोप झाले आहेत. मोरे यांच्या कार्यकाळातील सर्व मोजण्या रद्द करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. मात्र, मोरे यांच्यामुळे ज्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, त्यांना न्याय मिळणार का? असा प्रश्न नागरिक करीत आहेत.

पुणे जिल्ह्याचे भूमिअभिलेख विभागाचे तत्कालीन जिल्हा अधीक्षक सूर्यकांत मोरे यांनी त्यांच्या काळात भूमापनात मोठे फेरफार करून क्षेत्रफळ कमी-जास्त दाखविले, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. दरम्यान, सामान्य नागरिक जमीन मोजणीसाठी त्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवत असताना मोरे यांनी बिल्डर-राजकारण्यांच्या फायद्यासाठी काम केले.

त्यामुळे अनेक नागरिक हतबल झाले. शेतकऱ्यांच्या तक्रारींना डावलून मोरे यांनी बेकायदा कमाई केल्याचे गंभीर आरोप झाले आहेत. मोरे यांच्या कार्यकाळातील सर्व मोजण्या रद्द करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. मात्र, मोरे यांच्यामुळे ज्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, त्यांना न्याय मिळणार का? असा प्रश्न नागरिक करीत आहेत.

## कोमकर खून प्रकरण; बंडू आंदेकरसह अकरा जणांवर गुन्हा दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयुष गणेश कोमकर याच्या खूनप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यात बंडू आंदेकर, कृष्णा आंदेकर, शिवम आंदेकर यांच्यासह अकरा जणांच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये दोन महिलांचा देखील समावेश आहे. याप्रकरणी आयुष याची आई कल्याणी कोमकर (रा. भवानी पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. दरम्यान गुन्हे शाखेच्या पथकाने दोघा संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे कसून तपास करण्यात येत असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे. अमित पाटोळे आणि यश पाटील अशी त्यांची नावे आहेत. शुक्रवारी (दि.५)

**● दोघा संशयितांना गुन्हे शाखेने घेतले ताब्यात**

सायंकाळी साडे सात वाजताच्या सुमारास नाना पेठेतील लक्ष्मी कॉम्प्लेक्सच्या पार्किंगमध्ये आयुष याचा पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करण्यात आला आहे. गणेश कोमकर हा माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खून प्रकरणातील आरोपी आहे. आंदेकर टोळीकडून वनराज यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी आयुष याचा खून करण्यात आल्याचे बोलले जाते आहे. पाच दिवसापूर्वी आंदेकर टोळीकडून आंबेगाव पठार परिसरात सोमनाथ गायकवाड, अनिकेत दुधभाते यांच्या घराची रेकी करण्यात आली होती.

## थोडक्यात




### बापूसाहेब पोकळे यांचा मुख्यमंत्री सहायता निधीस ३१ हजारांचा हातभार

पुणे (आरंभ पर्व) : खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी मुख्यमंत्री सहायता निधीस तब्बल 31 हजार रुपयांची मदत दिली. पोकळे यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आगळावेगळा सन्मान ठरला आहे. या कार्यक्रमास प्रभाग अध्यक्ष तुषार पोकळे, सचिन मनेरे, सागर पोकळे, ऋषिकेश पोकळे, दादासाहेब भूरूक तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सामाजिक योगदानाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पोकळे यांनी उचललेले हे पाऊल कौतुकास्पद असल्याचे मत आमदार भीमराव तापकीर यांनी व्यक्त केले. "बापूसाहेब पोकळे सारखा कार्यकर्ता सदैव जनतेच्या भल्यासाठी सक्रिय राहिला पाहिजे. अशा कार्यकर्त्यांच्या पाठीशी मी नेहमीच ठामपणे उभा राहीन," असा विश्वास आमदार तापकीर यांनी यावेळी व्यक्त केला.



### माऊली चव्हाण यांचे निधन

धायरी (पुणे) (आरंभ पर्व) : धायरी येथील प्रसिद्ध उद्योजक माऊली बंडोजी चव्हाण यांचे अल्पशा आजाराने आकस्मित निधन झाले. ते 62 वर्षांचे होते. त्यांच्या अचानक झालेल्या निधनाने धायरी परिसरात तसेच मित्रपरिवार व नातेवाईकांमध्ये शोककळा पसरली आहे. माऊली चव्हाण हे साधे, मनमिळाऊ व समाजाभिमुख व्यक्तिमत्व म्हणून परिचित होते. शेती व उद्योग यामध्ये त्यांना आवड होती. स्थानिक स्तरावर सर्वांशी स्नेहसंबंध ठेवून त्यांनी आपली वेगळी छाप निर्माण केली होती. त्यांच्या निधनामुळे परिसरातील एक आपुलकीचे व्यक्तिमत्व हरपल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. माऊली चव्हाण हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) खडकवासला मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांचे बंधू होत. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्यावर धायरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली वाहिली. शोककुल वातावरणात चव्हाण यांना अखेरचा निरोप देण्यात आला.



### लोपमुद्रा मीरा मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचा शुभारंभ

पुणे (आरंभ पर्व) : नागरिकांच्या आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी स्वारगेट परिसरात लोपमुद्रा मीरा मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल भव्य थाटामाटात सुरू झाले. हॉस्पिटलमध्ये मातांसाठी आणि बालकांसाठी स्वतंत्र विभाग, २४ तास आपत्कालीन सेवा, हृदयरोग, हाडांचे आजार, स्त्रीरोग, बालरोग आणि इतर शाखांसाठी तज्ज्ञ डॉक्टर व आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. संस्थापक डॉ.अवधूत बोदमवाड यांनी सांगितले की, आधुनिक सुविधा आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी यांच्या साहाय्याने हे हॉस्पिटल ग्रामीण व शहरी रुग्णांना उच्च प्रतीची सेवा देईल. गंभीर आजारांसाठी महानगरात जावे लागत नसेल, वेळ व पैसा दोन्ही वाचेल, आणि गरीब व गरजू रुग्णांसाठी सवलतीच्या दरात तपासण्या, उपचार व शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत.

# धायरीतील मराठा समाजाचा दानशूरपणा

## मुंबईसाठी जमवलेली मदत पुण्यातील शाळा, वृद्धाश्रम व संस्थांना वाटप

> "आंदोलनासाठी जमलेली मदत माघारी नेण्यापेक्षा ती गरजूंना वाटली, तरच खऱ्या अर्थाने समाजकारण फळाला येते. शाळा आणि वृद्धाश्रमांपर्यंत पोहोचणारी ही मदत म्हणजेच खरी समाजसेवा आहे."
> – शिवाजीराव मते, मराठा सेवक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठा क्रांती मोर्चाच्या मुंबईतील उपासमारीच्या बातम्या प्रसारित होताच मदतीसाठी महाराष्ट्रभर उसळलेली चळवळ धायरी गावातही पोहोचली. मराठा बांधव, गणेश मंडळे व बहुजन समाज एकत्र येत मदतीचा मोठा उपक्रम हाती घेतला. गावकऱ्यांनी अन्नधान्य, पाणी व टिकाऊ खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणात जमा करून काही तासांतच ट्रकभर साहित्य तयार केले.

मराठा सेवक शिवाजीराव मते, नेताजी बाबर, राजेश पोकळे व सहकाऱ्यांनी ही मदत मुंबईला रवाना केली. मात्र तेथे आधीच प्रचंड प्रमाणात साहित्य पोहोचल्याने आंदोलनकर्त्यांनी "ही मदत तुम्ही तुमच्या परिसरातील गरजूंना द्या" असे आवाहन केले. त्यानंतर धायरीतील बांधवांनी सर्व साहित्य पुन्हा पुण्यात आणले.

यानंतर ही मदत वृद्धाश्रम, अनाथालये, अपंग व मूकबधिर मुलांच्या शाळा, ज्येष्ठ नागरिक संघ व सामाजिक संस्थांना वाटप करण्यात आली. त्यामुळे मदत खऱ्या अर्थाने ज्यांना गरज आहे, त्यांच्यापर्यंत पोहोचली.

या उपक्रमात कुणाल पोकळे, रणजीत जोरे, अभिषेक लायगुडे यांच्यासह मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. धायरी गावाने दाखवलेला दानशूरपणा आणि सामाजिक जबाबदारीचे भान हे एक आदर्श उदाहरण ठरत असून या कार्याचे संपूर्ण महाराष्ट्रात कौतुक होत आहे.

# पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी विक्रमी ५,९२२ हरकती दाखल

**पुणे लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर नागरिक, राजकीय पक्ष आणि विविध सामाजिक संस्थांकडून मोठ्या प्रमाणात हरकती दाखल झाल्या आहेत. यंदा एकूण ५,९२२ हरकती दाखल झाल्या असून हा आकडा विक्रमी ठरला आहे. या संख्येमुळे शहरातील राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. दाखल झालेल्या हरकतींमध्ये सर्वाधिक हरकती प्रभाग ३४ नऱ्हे-वडगाव बुद्रुक या प्रभागाविरोधात नोंदवण्यात आल्या आहेत. येथे तब्बल २,०६६ हरकती दाखल झाल्या असून हा सर्वाधिक आकडा

**● नऱ्हे-वडगाव प्रभागातून सर्वाधिक २,०६६ हरकती**

आहे. दुसऱ्या क्रमांकावर प्रभाग ३ विमाननगर-सोमनाथनगर असून येथे ८१९ हरकती आल्या आहेत. तर प्रभाग १५ मांजरी बुद्रुक-साडेसतरानळी येथे ५६० हरकती दाखल झाल्या आहेत. या आकड्यांवरून नागरिकांमध्ये असलेली नाराजी स्पष्टपणे दिसून येते. या सर्व हरकतींवर १०, ११ आणि १२ सप्टेंबर २०२५ रोजी सुनावणी होणार आहे. सुनावणीदरम्यान नागरिकांनी केलेल्या आक्षेपांची तपासणी केली जाईल. त्यानंतर अंतिम निर्णय घेऊन सर्व निकाल निवडणूक आयोगाकडे पाठवले जाणार असून त्यानंतरच अंतिम प्रभागरचना निश्चित केली जाणार आहे. हरकतींच्या विक्रमी संख्येमुळे स्थानिक नागरिक आणि राजकीय पक्षांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सीमारेषा आखण्यात झालेल्या विसंगती, लोकसंख्येतील असमतोल, आरक्षणातील बदल तसेच प्रभागाचे स्वरूप या बाबींवर सर्वाधिक आक्षेप नोंदवले गेले आहेत. आयोग या हरकतींवर कोणता निर्णय घेतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या विक्रमी हरकतींमुळे पुणे महानगरपालिका निवडणुकीचे राजकारण अधिकच तापले आहे आणि सुनावणीनंतरचा निर्णय हा केवळ राजकीय पक्षांसाठीच नव्हे तर सर्वसामान्य पुणेकरांसाठीही निर्णायक ठरणार आहे.

# ओबीसींवर अन्याय होणार नाही : पंकजा मुंडे

**महेश वरवटे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठा आरक्षणाचा मुद्दा तापलेला असताना ओबीसी समाजामध्ये अस्वस्थता निर्माण होऊ नये, यासाठी राज्य सरकार दक्ष राहील. "ओबीसींवर कोणत्याही परिस्थितीत अन्याय होणार नाही, अशीच ठाम भूमिका सरकार घेईल," असे आश्वासन भाजप नेत्या व केंद्रीय मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.



गेल्या काही दिवसांपासून मराठा समाजाला कुणबी म्हणून ओळख देण्याचा प्रश्न राज्यात गाजत आहे. त्यावरून ओबीसी समाजामध्ये आरक्षणाच्या गळतीबाबत भीती व्यक्त होत आहे.

यावर भाष्य करताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, "मराठा समाजाच्या भावना आम्ही समजतो, परंतु त्याचबरोबर ओबीसी समाजाचे हक्कही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, याची पूर्ण काळजी सरकार घेईल."

त्यांनी पुढे सांगितले की, आरक्षण ही अत्यंत संवेदनशील बाब आहे. त्यामुळे सरकार सर्व कायदेशीर बाबींचा विचार करून, सामाजिक समतोल बिघडणार नाही अशा पद्धतीने निर्णय घेणार आहे.

"ओबीसींच्या वाट्याला येणारे आरक्षण अबाधित राहील. मराठा समाजालाही न्याय मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. दोन्ही समाजांमध्ये संघर्ष होऊ नये, हा आमचा प्रयत्न आहे," असे त्या म्हणाल्या.

पंकजा मुंडे यांनी यावेळी ओबीसी समाजाला आवाहन केले की, "सरकारवर विश्वास ठेवा. कुणाच्याही हक्कावर गदा आणली जाणार नाही. न्याय, समता आणि संतुलन या तत्वांवरच पुढील वाटचाल होईल."

## इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेसोबत भागीदारी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड, पूर्वाश्रमीची मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक यांनी टियर १ च्या पलीकडे जाऊन ग्रामीण भारतातील नवीन प्रादेशिक बाजारपेठांमध्ये वाजवी दरातील जीवन विमा उपायांचा पुरवठा करण्याच्या उद्देशाने एका धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. ही भागीदारी आयपीपीबीच्या ६५० बँकिंग आउटलेट्स आणि १.६४ लाखांहून अधिक प्रवेश पॉइंट्सच्या मजबूत नेटवर्कचा वापर करून टियर ३, टियर ४ आणि ग्रामीण बाजारपेठांमधील ग्राहकांना गरजेनुसार जीवन विमा उपायांचा एक व्यापक संच देईल. केंद्र सरकारच्या आर्थिक समावेशन उद्दिष्टांशीदेखील ही बाब सुसंगत असून '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' साध्य करण्याच्या आयआरडीएआयच्या दृष्टिकोनाला समर्थन देते.

## 'ग्लोबल गणेश फोटोग्राफी व रील्स स्पर्धा'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने ग्लोबल गणेश फेस्टिवलअंतर्गत 'ग्लोबल गणेश फोटोग्राफी व रील्स स्पर्धा २०२५' आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रप्रथम ट्रस्ट, सदैव फाऊंडेशन आणि अमित फाटक फाऊंडेशन यांचे यामध्ये सहकार्य लाभले. मोठ्या उत्साहात भक्तिभावाने गणेशोत्सव पार पडत असून, ग्लोबल गणेश फेस्टिवलअंतर्गत विविध उपक्रम, स्पर्धा आयोजिल्या आहेत. येत्या ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत या स्पर्धेत फोटो व रील्स पाठवता येतील.पुण्याचा गणेशोत्सव, त्याची भव्यता जागतिक स्तरावर पोहोचावी, यासाठी ही फोटोग्राफी आणि रील्स स्पर्धा घेण्यात येत आहे. गणेशभक्तांनी या दहा दिवसांच्या काळात आपल्या मोबाईल, कॅमेरामध्ये हा महोत्सव वेगवेगळ्या नजरेतून टिपला आहे. अनेकांनी देखावे, सजावट, गर्दी, गणेशोत्सवातील वैशिट्यपूर्ण क्षण आपल्या डिजिटल नजरेत कैद केले आहेत. हे सगळे जागतिक स्तरावर जाण्यासाठी ही स्पर्धा महत्वपूर्ण ठरणार आहे. तेव्हा आपण प्रत्येकाने या स्पर्धेत सहभागी होऊन काढलेले फोटो, रील्स आमच्यापर्यंत पोहोचवावेत. उत्कृष्ट फोटो, रील्ससाठी रोख पारितोषिक, प्रमाणपत्र दिले जाणार आहे. फोटोग्राफी आणि रील्स या दोन्ही प्रकारात तीन क्रमांक काढले जाणार आहेत. प्रथम क्रमांकास १५,०००/-, द्वितीय क्रमांकास १०,०००/- तर तृतीय क्रमांकास ५,०००/- रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे.

## आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह

**वडगाव (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त वडगाव धायरी परिसरात विविध समाजोपयोगी उपक्रमांचा सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला. हा सेवा सप्ताह माजी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या वतीने 23 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर 2025 या कालावधीत संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत नागरिकांना थेट उपयोगी ठरतील असे अनेक कार्यक्रम घेण्यात आले. शासकीय योजनांचे मार्गदर्शन शिबिर घेऊन लाभार्थ्यांना माहिती देण्यात आली. आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करून मोफत तपासणी व उपचार सल्ला उपलब्ध करून देण्यात आला. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना भेट देऊन फळांचे वाटप



करण्यात आले. महिलांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण शिबिर घेऊन त्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. सेवा सप्ताहाच्या या कार्यक्रमांना परिसरातील विविध मान्यवरांनी हजेरी लावून प्रोत्साहन दिले. यामध्ये बाळासाहेब पोकळे, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, धनंजय पोकळे, भाजपा वडगाव धायरी मंडळाचे अध्यक्ष यशवंत लायगुडे, अनिल चरवड, भाजपा युवा मोर्चाचे सारंग नवले, अनिल मते, सुहास पवार, चंद्रकांत पवळे, केदार जाधव आदींचा समावेश होता.

वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्ताहातून समाजातील विविध घटकांपर्यंत प्रत्यक्ष मदत आणि मार्गदर्शन पोहोचविण्यात आले. या उपक्रमांचे ज्येष्ठ नागरिकांनी मनापासून कौतुक केले.

# अडचणीतून उभी राहिलेली कलेची दुनिया


## राहुल लोहकरे यांचा अद्भुत प्रवास

**पुणे (लक्ष्मण साबळे) (दै. आरंभ पर्व)**

विठ्ठलवाडीचे राहुल शामराव लोहकरे हे दहावीपर्यंतच शिक्षण घेऊ शकले. शालेय जीवनात अपयश आले तरी आईचा आशीर्वाद, देवावरील श्रद्धा आणि कलेची ओढ या बळावर त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

२००४ साली छोट्या प्रयत्नातून सुरू केलेला स्टेन्ड ग्लास आर्ट आज राहुलची खास ओळख ठरली आहे. हाताने काच कापून, कॉपर टेप व लेड वेल्डिंगच्या साहाय्याने तयार होणाऱ्या या काच प्रतिमा प्रकाशमान झाल्यावर अप्रतिम भासतात. आतापर्यंत त्यांनी १५० पेक्षा अधिक देव-देवतांच्या काच प्रतिमा साकारल्या असून दगडूशेठ गणपती, लालबागचा राजा, शिवराज्याभिषेक सोहळा, स्वामी समर्थ, श्रीपाद श्रीवल्लभ, अष्टलक्ष्मी, सावित्रीबाई फुले अशा अनेक प्रतिमा घर, संस्था व देवस्थानांमध्ये प्रतिष्ठापित झाल्या आहेत.

राहुल यांच्या कलेला भारत वर्ल्ड रेकॉर्ड, इंटरनॅशनल वंडर बुक ऑफ रेकॉर्ड्स (लंडन), दुबई आंतरराष्ट्रीय आर्ट कॉम्पिटिशनसह तब्बल १८ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या मेहनतीने आज १०x१२ ची कार्यशाळा कलाकारांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. अलीकडेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची काच प्रतिमा त्यांनी पूर्ण केली. श्री चेतन लोढा यांच्या सहकार्याने ही प्रतिमा ट्रस्ट अध्यक्ष मा. सुनील रासने आणि सिद्धीविनायक ग्रुपचे चेअरमन श्री राजुशेठ सांकला यांच्या हस्ते, थेट



श्री दगडूशेठ हलवाई गणेश मंदिरात पूजित झाली. ३०x३६ इंच आकाराची ही प्रतिमा तयार करण्यास २९ दिवस लागले. दररोज ४-५ तास काम करून बेसिक फ्रॉस्टेड, लाल, पिवळा, लाईट ब्राऊन अशा आयात काचा वापरून ती साकारण्यात आली असून २४ इंची ४ LED ट्यूब लाईट्स बसवून प्रतिमा प्रकाशमान करण्यात आली आहे.

या निमित्ताने मान्यवरांनी राहुलच्या कलेचे कौतुक करताना म्हटले की –

"प्रतिकूल परिस्थितीतही कला जपण्याची ताकद राहुलमध्ये आहे, आणि ही कला जगभर पोहोचली पाहिजे."

"अडचणींतून उमलते जे सौंदर्य,
तेच खऱ्या कलेचे चिरंतन वैभव."

अशा या कलाकारास सर्वांनी दात द्यावी अशीच सदिच्छा या निमित्त..





## आ. भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**३२२ रक्तदात्यांचा सहभाग – मान्यवर व कार्यकर्त्यांची उपस्थिती**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भीमरावअण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त अनुश्री हॉल, माणिकबाग येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन शहर भाजपा उपाध्यक्ष सचिनमोरे यांच्या वतीने करण्यात आले होते.

या शिबिराला परिसरातील नागरिक, युवक व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तब्बल ३२२ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजकारणात मोलाची भर टाकली. इतक्या मोठ्या प्रमाणात नागरिक सरसावल्यानं समाजात रक्तदानाविषयी जागरूकता आणि महत्व अधोरेखित झाले.

स्वतः आमदार भीमरावअण्णा तापकीर यांनी शिबिराला भेट देऊन रक्तदात्यांशी संवाद साधला. त्यांनी प्रत्येक रक्तदात्याचे कौतुक करताना सांगितले की, "रक्तदान हे श्रेष्ठ दान असून ते मानवतेचे खरे दान आहे. प्रत्येकाने यात सक्रिय सहभाग घ्यायला हवा."

शिबिरादरम्यान आयोजक सचिन मोरे यांनी आमदार तापकीर यांचे स्वागत केले तसेच रक्तदात्यांचे आभार मानले. आपल्या भाषणात त्यांनी आमदार तापकीर यांच्या नेतृत्वाखाली खडकवासला मतदारसंघात झालेल्या विकासकामांचा आढावा घेतला आणि विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

या रक्तदान शिबिराला भाजपा पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजप मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, खडकवासला मतदारसंघाचे सरचिटणीस बापूसाहेब पोकळे,

शहर भाजपा उपाध्यक्ष अमोल ठाकर, सरचिटणीस मंगेश हरडे, मंडल सरचिटणीस सचिन मणेरे, युवा मोर्चा अध्यक्ष विशाल उभे, युवा मोर्चा सरचिटणीस प्रवीण देशमुख, टेम्पो आघाडी अध्यक्ष विजय गुमटे आदींचा समावेश होता.

या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व कार्यकर्त्यांनी उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला. संपूर्ण वातावरणात सेवाभाव, ऐक्य आणि जनजागृतीची भावना अनुभवायला मिळाली.

# अनाथाश्रमास साहित्य वाटप



> आ. तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला. जनहितार्थ काम करणे हे आपलं कर्तव्य आम्ही सर्वजण समजतो. जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे.
> - नवनाथ तागुंदे, अध्यक्ष खडकवासला ग्रामीण

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तपकीर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप पदाधिकाऱ्यांनी एक सामाजिक उपक्रम राबविला.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील जे (ता. हवेली) येथील 'आपलं घर अनाथाश्रम' येथील विद्यार्थ्यांना भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून दोन महिन्यांचा जीवनावश्यक साहित्याचा पुरवठा करण्यात आला.

यामध्ये तांदूळ, गहू, साखर, तेल, डाळी आदी वस्तूंचा समावेश होता. अनाथाश्रमाचे संचालक विजयराव फळणीकर यांनी याबद्दल भाजप पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

हा उपक्रम आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त राबवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, उपजीविकेसाठी सातत्याने सहकार्य करण्याचे आश्वासनही यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी दिले.

जिल्हा अध्यक्ष शेखर वडणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे पाटील, मांडवी बुद्रुक चे माजी सरपंच सचिन पायगुडे, दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाजीराव पारगे, खडकवासला ग्रामीण युवा मोर्चा अध्यक्ष शरद जावळकर, व्यापारी आघाडीचे हवेली तालुकाध्यक्ष नंदू जावळकर, सरपंच विठ्ठल जाधव, माजी सरपंच विजय पवार, वरदोडे चे माजी सरपंच विठ्ठल ठाकर राजीव भामे प्रशांत दारवटकर माधव चव्हाण विजय मते श्रेयसखेरीज हेमांगी कोडीतकर मान्यवर उपस्थित होते.



## गणेशोत्सवानिमित्त नांदेड सिटी फेस्टिवल उत्साहात

- स्व.निर्मला घुले प्रतिष्ठान तर्फे विविध मान्यवरांचा सत्कार
- अभिनेता हार्दिक जोशी, सुरेश विश्वकर्मा, रुपेश घुले पाटील यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
नांदेड सिटी कल्चर असोसिएशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्त नांदेड सिटी फेस्टिवलचे भव्य आयोजन करण्यात आले. या फेस्टिवलमध्ये 'तुझ्यात जीव रंगला' फेम लोकप्रिय अभिनेता हार्दिक जोशी, तसेच 'सैराट' फेम अभिनेता सुरेश विश्वकर्मा यांच्यासह नांदेड सिटी परिसरातील सोसायटी चेअरमन

सर्व सोसायटीतील चेअरमन पंकज देडगे,काशिनाथ मते,स्वप्नील कारले,विकास देडगे ,हर्षद घुले,नाना देशमुख, राम बेद्रे, भाऊसाहेब पाटील ,रत्नदीप जाधव

विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. नृत्यस्पर्धेला महिलांसह लहानग्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेषतः नांदेड सिटी परिसरातील महिलांनी व मुलींनी केलेल्या लक्षणीय सहभागामुळे संपूर्ण सभागृहात उत्साहाचे वातावरण रंगले. उपस्थित प्रेक्षकांनीही या कार्यक्रमाला भरभरून दाद दिली.

या सोहळ्याचा विशेष आकर्षणाचा क्षण म्हणजे भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी घेतलेला पुढाकार. त्यांनी निर्मला घुले प्रतिष्ठान तर्फे मान्यवरांचा सन्मान करून त्यांचा गौरव केला. रुपेश घुले पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "गणेशोत्सव हा केवळ श्रद्धेचा नव्हे तर समाजातील ऐक्य, संस्कृती आणि महिलांच्या सहभागाचा उत्सव आहे." त्यांच्या या शब्दांना उपस्थित मान्यवरांनीही मोठ्या टाळ्यांचा कडकडाट करून दाद दिली.

अभिनेता हार्दिक जोशी तसेच सुरेश विश्वकर्मा यांनीही या प्रसंगी उपस्थित महिलांशी संवाद साधत गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समाजातील ऐक्य वृद्धिंगत होते आणि स्थानिक कलावंतांना व्यासपीठ मिळते.

समारोपाला रुपेश घुले पाटील यांनी उपस्थित सर्व मान्यवर, महिला भगिनी आणि परिसरातील नागरिकांचे आभार मानत पुढील काळातही असे उपक्रम सातत्याने आयोजित करण्याची ग्वाही दिली.

गणरायाच्या उत्साहात पार पडलेला हा फेस्टिवल नांदेड सिटी परिसरातील सांस्कृतिक आणि सामाजिक वातावरण अधिकच संचारमय करणारा ठरला.

## शिवीगाळ व हाणामारीने राजगुरुनगर बँकेच्या वार्षिक सभेला गालबोट

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
येथील राजगुरुनगर सहकारी बँकेची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.७) झाली. परंतु सभेदरम्यान प्रश्न विचारण्यावरून दोन सभासदांमध्ये शिवीगाळ व हाणामारी झाल्याने वार्षिक सभेला गालबोट लागले. एका सभासदाने दुसऱ्या सभासदाला भर सभेत माईकने मारहाण करण्याचा प्रकार घडला.

या सभेला बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे यांच्यासह उपाध्यक्ष अश्विनी पाचारणे, जेष्ठ संचालक किरण आहेर, विजया शिंदे, राजेंद्र सांडभोर, राजेंद्र वाळुंज, गणेश थिगळे, अरुण थिगळे, दिनेश ओसवाल, अॅड. राहुल तांबे, विनायक घुमटकर, विजय डोळस, अविनाश कहाणे, रामदास धनवटे, दत्तात्रय भेगडे, समीर आहेर, सचिन मांजरे, तज्ञ संचालक धर्मेंद्र खांडरे, गौतम कोतवाल, सुरेश कौदरे, प्रकाश डोळस, विकास बाणखेले, दीपक वारुळे, महेश शेवकरी मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे, वरिष्ठ अधिकारी संजय ससाणे, अमृत टाकळकर, सम्राट सुपेकर, अंकुश कोहिणकर, दिलीप मलघे, बाळासाहेब घोलप, मंजित महिंद्रकर यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात सागर पाटोळे म्हणाले, राजगुरूनगर सहकारी बँकेने ग्राहकांसाठी इंटरनेट बँकिंग सुविधा सुरु केल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांची बँक म्हणून बँकेची ओळख सर्वत्र आहे. ग्राहक सभासद यांच्या हिताचे निर्णय घेऊन व आरबीआयचे निर्बंध यांचे काटेकोर पालन केल्याने सहकार क्षेत्रात भरारी घेऊन अनेक पुरस्कार बँकेने मिळवले आहेत.

सभासदाच्या वतीने शांताराम घुमटकर, हिरामण सातकर , अनिल (बाबा ) राक्षे, अॅड. महादेव घुले, अशोक दुगड, प्रकाश पाचारणे, रेवणनाथ थिगळे, शरद मुऱ्हे, कालिदास सातकर, सुरेश टाकळकर, शिवाजी वर्पे, अॅड. वैभव कर्वे, सुधीर वाळुंज, अनिल वरकड आदींनी प्रश्न विचारले. सभासदांच्या प्रश्नांना बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, संचालक किरण आहेर, दिनेश ओसवाल आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे यांनी उत्तरे दिली.

१४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आलेले सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

## थोडक्यात



### एकता ग्रुप गणेशोत्सव मंडळाच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

बार्शी (आरंभ पर्व) : सारोळे येथे एकता ग्रुप सामाजिक संस्थेच्या वतीने गणेशोत्सव व शिक्षक दिनाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. एकता चौक, वेताळनगरी येथे पार पडलेल्या या शिबिरास नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. शिबिराचे उद्घाटन वैराग पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. कुंदन गावडे यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी सहायक पोलिस उपनिरीक्षक कोलते साहेब, माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे आदी मान्यवर विशेष उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत माजी सरपंच बाळराजे गाटे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक कार्यकर्ते बालाजीभाऊ निचळ यांनी केले. या शिबिरात तब्बल ९१ जणांनी रक्तदान केले. उपसरपंच जितेंद्र चौधरी, मुख्याध्यापक धनाजी तीकटे, किरण गाटे, अध्यक्ष धीरज गाटे, विनोद डोके, सयाजी चौधरी, विपिन गाटे,अनिकेत गाटे, चंद्रकांत साबळे, पोलीस पाटील अण्णा साबळे, विपीन पाटील, प्रकाश गाटे, मोहन अण्णा गाटे, कल्याण पाटील यांच्यासह मंडळातील पदाधिकारी, कार्यकर्ते व रक्तदाते मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी शिक्षक दिनाच्या औचित्य साधून शिक्षकांचा सत्कारही करण्यात आला. उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या शिबिराची पंचक्रोशीत विशेष चर्चा होत असून गणेशोत्सवात सामाजिक जाणिवा जोपासण्याचा आदर्श उपक्रम ठरला आहे.

धोंडिराम कुंभार व पूजा कुंभार यांच्या हस्ते

### फणी आळी तालीम ट्रस्ट सार्वजनिक गणेश मंडळात आरती



पुणे (आरंभ पर्व) : शहरातील फणी आळी तालीम ट्रस्ट सार्वजनिक गणेश मंडळामध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर धार्मिक व उत्साहपूर्ण वातावरणात आरतीचा कार्यक्रम पार पडला. या विशेष धोंडिराम कुंभार व पूजा कुंभार यांच्या हस्ते श्री गणरायाची आरती करण्यात आली. आरतीच्या वेळी मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र खराडे व दीपक मोहळे यांची विशेष उपस्थिती लाभली होती. गणेश मंडळाने आयोजित केलेल्या या धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कुंभार दांपत्याच्या उपस्थितीमुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, गणेशोत्सव साजरा करताना सामाजिक भान जपण्याचा संदेश देण्यात आला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने अशा प्रकारचे कार्यक्रम समाजामध्ये एकोपा, श्रद्धा आणि सेवाभाव वाढवण्यासाठी उपयुक्त ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## जी. एम. फाऊंडेशनचा १६ वर्षांपासून मुर्ती दानाचा उपक्रम

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
लोणी काळभोर येथील महात्मा फुले नगर मधील जी. एम. ग्रुप गणेश मंडळ गेल्या सोळा वर्षा पासुन गणेशोत्सवाच्या माध्यमातून मुर्ती दानाचा उपक्रम राबवित आहे .

दर वर्षी अनेक गणेश भक्त मुर्तीदानास प्रचंड प्रतिसाद देत असुन .यावेळी सुद्धा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याचे मंडळाच्या कार्यकर्तांनी सांगितले . मोठ्या भक्ती भावाने आपण गणपती बाप्पांचा गणेशोत्सव साजरा करतो आणि विसर्जन करतो .गणेशाची प्लॅस्टर ऑफ पॅरीसची मुर्ती दुसऱ्या दिवशी नदी नाल्यामध्ये भग्नावस्थेत



पाहिल्या नंतर मनाला दु:ख होते . पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी मुर्ती दानाची संकल्पना आम्ही काढली . असे मत मंडळाचे कार्यकर्ते संदीप फुले यांनी केले .लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी मंडळाचे कौतुक करताना सांगितले की मुर्ती पाण्यात न सोडता दान केल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास टाळता येतो.

जी.एम ग्रुपच्या माध्यमातुन अनेक उपक्रम राबविले जातात यामध्ये बेटी बचाओ बेटी पढाओ ,पाणी आडवा पाणी जिरवा ,पुरग्रस्त बांधवांना मदत ,इत्यादी अनेक सामाजिक कार्य केले जाते .

## सिंहगड रोड गणेश विसर्जन घाटावर उत्साहपूर्ण विसर्जन



**नांदेड (दै. आरंभ पर्व)**
सिंहगड रोड क्षत्रिय कार्यालय अंतर्गत नांदेड गाव आरोग्य कोटी, नांदेड व नांदेड सिटी गणेश विसर्जन घाट येथे यंदा गणेश विसर्जन मोठ्या उत्साहात पार पडले.

यावेळी पुणे महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार, वरिष्ठ आरोग्य अधिकारी आशिष सुकणार, मंगलदास माने, देशमुख, अरविंद, निरीक्षक राकेश जोरी, मुकादम शंकर रणदिवे, हेमंत पवार तसेच मनपा सेवक अशोक तारु,दत्तात्रय जाधव, पासलकर गणेश जगताप, सुरेखा दारवटकर, भटकर, ठेकेदार ओंकार मुजरव यांनी सहकार्य केले.

तसेच सामाजिक कार्यकर्ते कालदास दरेकर,पोलीस हवालदार विनोद भंडलकर यांचेही विशेष योगदान लाभले. नागरिकांनी या घाटावर गणेश विसर्जन करून भावपूर्ण निरोप दिला. या कार्यक्रमाला भाजपा मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील विशेष उपस्थित होते.

दैनिक आरंभपर्व च्या विशेषांकाचे

# आमदार तापकीर यांच्या हस्ते प्रकाशन





**लक्ष्मण साबळे**

- सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आमदार भीमराव आण्णा तापकीर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा
- आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान व मोफत चष्मा वाटप अशा जनकल्याणकारी उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव आण्णा तापकीर यांचा वाढदिवस यावर्षी सामाजिक जाणीवेची जपणूक करणाऱ्या उपक्रमांनी साजरा करण्यात आला. धनकवडी येथील पूर्ती सोसायटी हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहात सहभाग नोंदवला.

कार्यक्रमात रक्तदान शिबिर, "शासन आपल्या दारी" उपक्रम, मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप, कान-नाक-घसा तपासणी अशा विविध आरोग्यविषयक सेवा नागरिकांना देण्यात आल्या. या माध्यमातून हजारो नागरिकांची तपासणी करण्यात आली. वाढदिवसाचा आनंद सामाजिक बांधिलकीशी जोडण्याचा हा उपक्रम नागरिकांना विशेष भावला.

या प्रसंगी आमदार तापकीर म्हणाले, "माझा वाढदिवस समाजहिताशी निगडित उपक्रमांच्या माध्यमातून साजरा होतो, हीच माझ्यासाठी खरी आनंदाची गोष्ट आहे. नागरिकांचे प्रेम, आशीर्वाद आणि पाठबळ हेच माझे बळ आहे."

समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनीही या कार्यक्रमात उपस्थित राहून आमदारांना शुभेच्छा दिल्या. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, क्रीडा तसेच शासकीय क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून कार्यक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद दिला.

या प्रसंगी दैनिक आरंभपर्वच्या विशेषांकाचे प्रकाशन आमदार तापकीर यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रकाशनावेळी माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे, भाजपा शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, भाजप नेते बापूसाहेब पोकळे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, पै. तुषार पोकळे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. तापकीर यांनी दैनिक आरंभपर्वला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमात आनंदी, भावनिक आणि सामाजिक वातावरण अनुभवायला मिळाले. नागरिकांनी या पद्धतीने वाढदिवस साजरा केल्याबद्दल आमदार तापकीर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## राजगुरूनगरमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत तरुणाईचा उत्साह



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
येथील राजगुरुनगर शहर व परिसरातील गणेश विसर्जन मिरवणुका नेहमीच्या उत्साहात व भक्तिभावपुर्ण वातावरणात झाल्या. शहरात साडेतास मिरवणुक सुरू होती, जिवंत देखावे, तरुणाईचं बेफान नृत्य आणि डीजे-डॉल्बीचा मुक्त वापर , ढोलताशे वाजवत गुलाल, भंडारा उधळत विसर्जन मिरवणुक पार पडली. मुख्य विसर्जन मिरवणुकीत सतरा सार्वजनिक गणेश मंडळांनी सहभाग घेतला.

पाऊस असला तरी यावर्षीचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा झाला. विसर्जन मिरवणूकही थाटामाटात काढण्यात आल्या. दहा दिवसांच्या उत्सव काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन गणेश मंडळांनी केले होते. अनेक मंडळांनी जिवंत देखावे साकारले तर अनेक मंडळांनी विद्युत रोषणाई व आकर्षक सजावट केली होती.

शनिवारी (दि. ६) गणपती विसर्जन मिरवणुकीची सुरुवात सांयकाळी सात वाजता पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील हुतात्मा स्मृती शिल्पापासून झाली. राजगुरूनगर शहरातील मानाच्या टिळक चौकाच्या गणपतीची पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते पूजा करून मिरणुकीला सुरुवात करण्यात आली. या विसर्जन मिरवणुकीत मानाचा पहिला गणपती टिळक चौक, त्यानंतर अनुक्रमे चिमण्या गणपती चौक, आझाद चौक, गणेश चौक, नेहरु चौक, संत सावतामहाराज मित्र मंडळ, अहिल्यादेवी चौक, सरदार चौक, वडगादी चौक, सिध्देश्वर चौक, बाजारपेठ, सिध्दीविनायक मित्र मंडळ, क्रांतीवीर राजगुरु मित्र मंडळ, हुतात्मा राजगुरु मित्र मंडळ, जुना मोटर स्टॅन्ड मित्र मंडळ, योगेश्वर मित्र मंडळ, एकविरा देवी मित्र मंडळ आदी नेहमीप्रमाणे क्रमाने जाणारी गणेश मंडळे विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाली होती. रात्री एक वाजता शेवटच्या गणपतीचे विसर्जन झाले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.